महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९ ४१४५ Email: doesttclass२.wrd@maharashtra.gov.in

**क्रमांक :संकीर्ण-२०२३/प्र.क्र.२०३/२३/आ(वर्ग-२),** **दिनांक : २२ फेब्रुवारी, २०२४**

**प्रति,**

१. जलसंपदा विभागातील सर्व महासंचालक,
२. सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळे,
३. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,
४. अधिक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे,
५. अधिक्षक अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक.
६. अधिक्षक अभियंता, दक्षता पथक, ठाणे / पुणे / औरंगाबाद / नागपूर / अमरावती.
७. अधिक्षक अभियंता, कृष्णा पाणी तंटा लवाद, विशेष कक्ष.

**विषय :- अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी वर्गणीदारास सेवानिवृत्त / मृत्यूनंतर भविष्य निर्वाह निधी खात्यातील अंतिम प्रदान नियमित शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच करणेबाबत..**

संदर्भ :- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/ प्र.क्र.३०८/ १६-ब, दि.२१ डिसेंबर,२०१९
२) सामान्य प्रशासन विभागाचे दि.२८.०१.२०२१ रोजीचे पत्र

महोदय,

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, १९९८ मधील नियम ४ नुसार, महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेले सर्व स्थायी शासकीय कर्मचारी, एक वर्षाची अखंड सेवा पूर्ण केलेले सर्व अस्थायी शासकीय कर्मचारी व पुन्हा सेवेत घेतलेले सर्व निवृत्तीवेतनधारी हे महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचे वर्गणीदार असतात. या नियमातील नियम २९ च्या तरतुदीनुसार वर्गणीदारास त्याच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा असलेली रक्कम त्याच्या नियत सेवानिवृत्तीच्या दिनांकानंतरच्या दिनांकास देय होते.

२. त्यानुषंगाने, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक २१ डिसेंबर २०१९ अनुसार ज्या अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्या आहेत अशा महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचे वर्गणीदार असलेल्या अधिसंख्य अधिकारी / कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती अथवा मृत्यूनंतर त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यातील रकमेचे अंतिम प्रदान किंवा भविष्य निर्वाह निधीमधील परतावा / ना परतावा रकमांचे प्रदान नियमित शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच करणेबाबत तसेच महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम,१९९८ मधील नियमांतील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्याबाबतची दक्षता घेण्यात यावी असे आपणास सुचीत करण्यात येत आहे.

( अनिल देवकाते )
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**सोबत:** वरीलप्रमाणे

Scanned with OKEN Scanner

**प्रत माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीस्तव :**

१) सह सचिव (आस्था),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई

२) उप सचिव (सेवा) ,जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई

३) अवर सचिव (संनि),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई

४) अवर सचिव (राकसे),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई

५) अवर सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, नरिमन पॉईन्ट, मुंबई-२१ यांना माहितीस्तव सादर.

६) आ (वर्ग-२) कार्यासन

Scanned with OKEN Scanner

1602/आ.वर्ग-2
18.09.2023

०१/५

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,विस्तार दालन क्रमांक ६२५ मुंबई ,४०००३२
दूरध्वनी क्र:-०२२-२२७९३२०८
Email ID-- desk13a.gad-mah@gov.in

क्रमांक : भनिनि ११२१/१०/प्र.क्र.३/१३-अ
दिनांक : २८ जानेवारी,२०२१.

प्रति,
अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

विषय : अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी वर्गणीदारास सेवानिवृत्त /मृत्यूनंतर भविष्य निर्वाह निधी खात्यातील रकमेचे अंतिम प्रदान करणेबाबत सर्व विभागांना सूचना...

महोदय,

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, १९९८ मधील नियम ४ नुसार, महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेले सर्व स्थायी शासकीय कर्मचारी, एक वर्षाची अखंड सेवा पूर्ण केलेले सर्व अस्थाई शासकीय कर्मचारी व पुन्हा सेवेत घेतलेले सर्व निवृत्तीवेतनधारी हे महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचे वर्गणीदार असतात. या नियमातील नियम २९ च्या तरतुदीनुसार वर्गणीदारास त्याच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा असलेली रक्कम त्याच्या नियत सेवानिवृत्तीच्या दिनांकानंतरच्या दिनांकास देय होते.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक २१ डिसेंबर,२०१९ अनुसार ज्या अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्या आहेत, अशा महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीचे वर्गणीदार असलेल्या अधिसंख्य अधिकारी / कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती अथवा मृत्यूनंतर त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यातील रकमेचे अंतिम प्रदान किंवा भविष्य निर्वाह निधीमधील परतावा / ना परतावा रकमांचे प्रदान नियमित शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच करण्यास प्रत्यवाय नाही. महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम,१९९८ मधील नियमांतील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांची असल्याने, यासंदर्भात विभागांनी आपल्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रीय कार्यालयांना कृपया सूचित करावे, ही विनंती.

आपली

(रोहिणी भालेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) संचालक,लेखा व कोषागारे संचालनालय,ठाकरसी हाऊस,३ रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, शुरजी वल्लभदास मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई.

२) निवडनस्ती.

Scanned with OKEN Scanner